# मिरा भाईंदर महानगरपालिका

## माहिती व जनसंपर्क विभाग

### प्रसिद्धीपत्रक

- **मिरा भाईंदर महानगरपालिकेकडून मिरा भाईंदर क्षेत्रातील अनधिकृत शाळा जाहीर**
- **नागरिकांना, प्रवेश न घेण्याचे आवाहन**

सन २०२५-२६ या शैक्षणिक वर्षाला लवकरच सूरूवात होणार असून शहरातील अनेक शाळांमार्फत प्रवेश प्रक्रिया राबविले जाणार आहे. याच पार्श्वभूमीवर शहरातील विद्यार्थ्यांच्या भविष्याच्या दृष्टीकोनातून मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या शिक्षण विभागामार्फत करण्यात आलेल्या सर्वेक्षणानूसार शहरात ०५ अनधिकृत शाळा असल्याचे निदर्शनात आले आहे.

शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, महाराष्ट्र शासन अंतर्गत शासन निर्णय दिनांक 19/06/2010 अन्वये शिक्षण हक्क कायद्यातील तरतुदीनुसार मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील शासन मान्यता नसलेल्या अनधिकृतपणे सुरू असलेल्या शाळांचे सर्वेक्षण करून माहिती प्राप्त झालेली आहे. शहरातील अनधिकृत शाळांची माहिती खालीलप्रमाणे देण्यात येत आहे.

**१) कनकधारा इंग्लिश स्कूल**

**बॉम्बे मार्केट जवळ ,स्टेशन रोड, भाईंदर पश्चिम**

**२) ट्रिनिटी स्कूल**

**काजूपाडा, घोडबंदर रोड ,भाईंदर जिल्हा ठाणे**

**३) विराज स्कूल**

**माशाचा पाडा, काशिमिरा, मिरा रोड जिल्हा ठाणे**

**४) नोवा स्कूल**

**शिव मंदिर जवळ, डाचकूलपाडा, भाईंदर जिल्हा ठाणे**

**५) सेंट जॉन्स मार थॉमा स्कूल**

**रामदेव पार्क ,मिरा रोड (पूर्व), जिल्हा ठाणे**

या प्रसिद्धीपत्राद्वारे शहरातील नागरिकांना सावधान, सूचित व आवाहन करण्यात येत आहे की, मिरा भाईंदर शहरात अनधिकृतपणे कार्यरत असलेल्या शाळांमध्ये कोणत्याही पालकांनी आपल्या पाल्यांचा प्रवेश करू नये. तसेच आपल्या पाल्यांचे शहरातील कोणत्याही शाळेत प्रवेश घेण्यापूर्वी शाळेची संपूर्ण तपासणी करून त्याचे अधिकृतता पडताळून व त्याची खात्री करून पाल्यांचा प्रवेश घ्यावा जेणेकरून पालकांची फसवणूक व त्यांच्या पाल्याच्या भविष्याची हानी होणार नाही.

तसेच बालकांचा मोफत व सक्तीचे शिक्षण अधिकार अधिनियम २००९ चे कलम १८ (५) अन्वये शासनाची कोणतीही परवानगी न मिळवता अनधिकृतपणे शाळा चालवित असलेल्या शहरातील/ परिसरातील/ प्रभागातील शाळांची माहिती नागरिकांच्या निदर्शनात आल्यास ती माहिती तात्काळ मिरा भाईंदर महानरगरपालिकेच्या शिक्षण विभागाला लेखी स्वरूपात कळवावी.

त्याचबरोबर उक्त प्रमाणे जाहीर करण्यात आलेल्या मिरा भाईंदर शहरातील अनधिकृत शाळांचे संचालक व व्यवस्थापकांना निर्देशित करण्यात येत आहे की, अनधिकृतपणे चालवित असलेल्या शाळा तात्काळ बंद करावे व शासनाच्या विहित पद्धतीनूसार सर्व मान्यता घेऊन शाळा कार्यन्वित करावे. उक्त जाहीर करण्यात आलेल्या शाळेच्या संचालक व व्यवस्थापकांनी शाळा बंद न केल्यास भारतीय न्याय संहितेच्या कलम ३१६, ३०८(१) आणि ३(१) अन्वये फौजदारी कारवाई करण्यात येईल.

मिरा भाईंदर शहरातील नागरिकांनी व सर्व शाळांनी शिक्षणाविषयी जागरूक राहून अशा अनधिकृत शाळांमध्ये प्रवेश न घेण्याचे आवाहन मिरा भाईंदर महानगरपालिका आयुक्त तथा प्रशासक राधाबिनोद अ. शर्मा (भा. प्र.से) यांनी केले आहे.